# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** विश्राम बाग

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0474 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**30/12/2024 15:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 7
**Date From (दिनांक पासून):** 10/12/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/12/2024
**Time From (वेळेपासून):** 18:49 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:19 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 30/12/2024 **Time (वेळ):** 15:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 019
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/12/2024 15:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भारती हस्पीटल सांगलीचे मेनगेट,समोरील सांगली मिरज रोड,लगत असले रिक्षा स्टप जवळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दिनांक 30/12/2024

मी सचिन कृष्णा पसारे, वय 42 वर्षे, व्यवसाय - सेंट्रींगकाम, रा. 2993/899 कुलकर्णी मळा, कोल्हापूर रोड कबनुर, ता.इचलकरंजी, जि. कोल्हापूर मो. नं. 9175651317

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास आहे. मी सेट्रींग सळी बांधणीचे काम करीत आहे. शिवनाकवाडी इचलकरंजी येथे सत्यराज पार्कमध्ये कारखान्याची इमारत बांधकाम सुरू असून मी सदर इमारतीचे स्लॅबची सळी बांधण्याचे काम घेतले आहे. माझ्याकडे एकुण 4 कामगार असून कामगार रामचंद्र माझी याचा लहान भाऊ धीरज माझी हा दि.07.12.2024 रोजी तो कामगार रामचंद्र माझी यास भेटण्यास आलेला होता. 11.30 वा चे सुमारास इमारतीचे बांधकामाचे ठिकाणी स्लॅबच्या प्लेटा व सळी बांधण्याचे काम सुरू असताना प्लेटा अचानक पडल्याने कामगार विकास चौधरी व धीरज माझी हे घसरुन पडल्याने त्यांचे डोक्याला दुखापत झाली होती. त्या दोघांना भारती हॉस्पीटल, सांगली येथे अँडमीट केले असुन त्यांच्यावर उपचार सुरु होते. दि.10.12.2024 रोजी विश्रामबाग पोलीस ठाणे येथील शेखर पाटणकर पोलीस यांनी माझ्याविरूध्द बालकामगार अंतर्गत गुन्हा दाखल न करण्यासाठी व धीरज माझी याचा जबाब माझ्या बाजुने घेण्यासाठी माझ्याकडे 50,000/- रूपयांची मागणी केली. मला शेखर पाटणकर यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी पोलीस उपअधीक्षक श्री.उमेश पाटील अन्टी करप्शन ब्युरो सांगली यांना संपर्क करुन माझी लाच मागणीची तक्रार कळवली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला अॅन्टी करप्शन कार्यालय सांगलीकडील पोलीस निरीक्षक श्री.विनायक भिलारे साहेब कारवाई करतील असे सांगुन दुपारी 16.00 वाचे सुमारास चाणक्य चौक, कुपवाड रोड, सांगली येथे येण्यास सांगीतले.

त्यानंतर 16.00 वाचे सुमारास पोलीस उप अधीक्षक श्री.पाटील साहेब यांनी मला संपर्क करुन त्यांचेकडील बोलेरो वाहनाचे वर्णन सांगुन चाणक्य चौक, कुपवाड रोड, सांगली येथे येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी माझेकडील रॉयल इन्फील्ड मोटार सायकल नं एम.एच.51- 4159 वरुन चाणक्य चौक, कुपवाड रोड, सांगली येथे दाखल झालो. मी मोटार सायकल पार्क करुन पाटील साहेब यांनी वर्णन सांगीतलेल्या बोलेरो वाहना जवळ जावुन माझी ओळख सांगीतली. पाटील साहेब यांनी मला बोलेरो मध्ये बसणेस सांगीतले त्याप्रमाणे मी बोलेरो वाहनामध्ये बसलो. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला भिलारे साहेबांची ओळख करुन दिली. भिलारे साहेबांनी मला सोबत असले दोन शासकीय पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. सदर कारवाई वेळी पंच नं.1 म्हणून श्री.सौरभ प्रकाश पटवर्धन यांनी व पंच नं.2 म्हणून श्री.साकिब राजू नाईकवाडी यांनी काम करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.विनायक भिलारे साहेब यांनी मला दिले सुचनेप्रमाणे मी माझी श्री.शेखर पाटणकर, पोलीस, विश्रामबाग पोलीस ठाणे यांचेविरूध्द लाच मागणी बाबतची तक्रार समक्ष सांगितली असता भिलारे साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहिती देवून माझा लेखी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी त्यांना माझा लेखी तक्रारी अर्ज दिला. माझे तक्रारी अर्जावर पोलीस निरीक्षक भिलारे साहेब व दोन्ही पंचानी वाचून सह्रा केल्या. त्यानंतर भिलारे साहेबांनी सांगली मिरज रोडला असले भारती हॉस्पीटल पासुन काही अंतरावर जिल्हा क्रिडा संकुलकडे कडे जाणारे रोड लगत असले हॉटेल शिवतारा जवळ हजर राहण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी माझेकडील मोटार सायकलने रवाना झालो. आमचे पाठोपाठ पाटील साहेब, भिलारे साहेब, पंच व सापळा पथक असे रवाना झाले. आम्ही सर्व हॉटेल शिवतारा नजीक दाखल झालो. भिलारे साहेबांनी मला शासकीय बोलेरो वाहनामध्ये बसण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी बोलेरो मध्ये बसलो. मी पाटणकर पोलीस यांचेविरुद्ध दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने भिलारे साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली. वर्दी जबाब दिनांक 30/12/2024

मी सचिन कृष्णा पसारे, वय 42 वर्षे, व्यवसाय - सेंट्रींगकाम, रा. 2993/899 कुलकर्णी मळा, कोल्हापूर रोड

त्याचा आज" असे सांगीतले. त्यावर त्यांनी "त्याचा जबाब घेतलाय, त्यात सॉफ्ट कॉर्नर पण घेतलाय आपण" असे मला सांगीतले. त्यावर त्यांना "सर त्यात धिरजच नांव लिहलायसा काय?" असे विचारले असता त्यांनी "नांव घ्यायला लागतय, अरे सगळ काय जे हाय ते" असे मला सांगीतले. त्यावर मी त्यांना " पण त्यो कामाला नव्हता म्हणून तुम्हाला सांगीतलोय" असे म्हणाले. त्यावर त्यांनी "त्यो पण चालला होता अस घेतलय, कामाला म्हणलं न्हाय त्यात" असे सांगीतले. त्यावर मी त्यांना "सर तुम्ही कस लिहला होता, सर्वजण कामाला होते, सर्वजण अस आल होत. उल्लेख आलाय मी तुम्हाला म्हणलो सर त्याच धिरजच नांव आल हाय, बाकीच काय न्हाय सर" असे म्हणालो, त्यावर ते मला "ते कसं आले होते, कामाला आले होते, कशाला आले होते, तुमचा जबाब घेतोय की परत त्यात" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "परत आणि होतोय का?" असे विचारले, असता त्यांनी "हां हिथ उभा होता" असे सांगीतले, मी त्यांना "त्रास होईल परत" असे विचारले असता त्यांनी "काय करायच सांग मला जायचं हाय गडबड हाय, तुमच्यासाठी वेळ काढून आलोय, मला वाटल तुम्ही अकरा वाजता येशिला" असे मला विचारले असता, मी त्यांना "न्हाय मी अकरा वाजोस्तर कसं, पेमेंटच माझ कणी इथं पण भरायचं होत, त्यामुळ जुळणी झाली न्हाय" असे म्हणालो. त्यावर पाटणकर पोलीस मला "ते हायत एकट उद्या काय बरं वाईट झालं तर काय? करणार तुम्ही" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "तुम्ही हाय का सांभाळायला" असे म्हणालो, त्यावर ते "आम्ही हाय की जोपर्यंत उद्याचाला दुसर कुणाची नेमणुक केली" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "आज ड्युटीला तुम्ही हाय उद्या सुट्टीला असणार दुसर कोणतर आल काय करणार" असे म्हणालो, असता त्यांनी मला "त्यांना सांगा माझे जबाब झालयं म्हणा त्यांच्यात" असे म्हणाले. त्यानंतर माझेत व त्यांचेत कामगारांचे सेफ्टी बाबत व कामगारांचे इन्शुरन्स बाबत चर्चा झाली. त्यावर ते मला "बरं काय आता बोलो" असे म्हणाले, त्यावर मी त्यांना "झालं की" असे सांगीतले. त्यांनी "किती केलाय" असे मला विचारले, मी त्यांना "किती पहिला एक सांगा काय तरी मग" असे म्हणालो. असता ते "हे बघा तुम्हाला त्रास होणार न्हाय जबाबदारी मी घेतो. ती बाहेरची हायतं उद्या काय बरं वाईट झालं तर त्यांच्या घरच्यांना तुम्हाला चार पैसे द्यावे लागणार, तुम्हाला पहिल्या पासणं सांगतोय काळजी घ्या त्यांची" असे म्हणाले, त्यावर मी त्यांना "काळजी तर 100 टक्के घेणार" असे सांगीतले. त्यावर त्यांनी "आम्ही मॅनेज करतो, काय अडचण न्हाय कोण ईल त्याला मी सांगतो, तुम्हाला बोललो की त्या दिवशी, तुम्हाला बोललो तेवढं करा आता" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "तुमचा आकडा लई मोठा चाललाय सर" असे म्हणालो असता त्यांनी "किती एक लाख सांगीतलय काय? एक लाख सांगीतलय" असे म्हणुन माझ्याकडे एक लाख रुपये लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना "मग तेच की न्हाय तुम्ही म्हणला पहिला एक लाख नंतर पन्नास वर आला नंतर पंचवीस मग अवघड होतय ओ सगळ" असे म्हणालो असता ते "एक लाख तुम्हास्नी सांगीतलच न्हाय मी आण्णा उगाच काय पण बोलू नका तुम्ही, तुम्हाला पंचवीस सांगीतलय, पंचवीस करा" असे म्हणुन माझ्याकडे पंचवीस हजार रुपये लाचेची मागणी करुन भविष्यात येणा-या अडचणी बाबत, कामगारांचे नोंदणी बाबत व त्यांचे इन्शुरन्स बाबत माझ्याशी चर्चा केली. त्यावर त्यांनी मला "उद्या तुमच्या हिशोबान फोन करा अकरा वाजता" असे सांगीतले, त्यावर त्यांना "चालतय ठिक हाय सर ओ येवु" असे विचारले त्यानंतर ते त्यांचेकडील मोटार सायकलने विश्रामबागच्या दिशेने निघुन गेले. त्यानंतर मी व पंच पटवर्धन असे माझे मोटार सायकलने भारती हॉस्पीटल येथून रवाना होवून भिलारे साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी भिलारे साहेबांनी पंच पटवर्धन व मला पडताळणीची हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन झालेल्या संभाषणाची खात्री केली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये पाटणकर पोलीस यांनी माझे विरुद्ध बालकामगार कामास ठेवले बाबत कारवाई न करण्यासाठी व जखमी धीरज माझी याचा जबाब माझ्या बाजुने घेण्यासाठी माझ्याकडे 25,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाल्याने व पाटणकर पोलीस यांनी मला दि.11.12.2024 रोजी सकाळी अकरा वाजता फोन करण्यास सांगीतल्याने पाटणकर पोलीस यांना अकरा वाजता फोन करुन सापळा कारवाईची वेळ व ठिकाण निश्चित करुन सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले. त्यानंतर भिलारे साहेबांनी सकाळी 11.00 वाजता 25,000/- रुपये उपलब्ध करुन लाच रक्कम देण्यासाठी घेवुन हॉटेल शिवतारा येथे हजर राहण्यास सांगुन जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी निघुन गेलो.

दि.11.12.2024 रोजी मी पोलीस उप अधीक्षक श्री उमेश पाटील साहेब यांना संपर्क करुन भारती हॉस्पीटल येथे आलो असल्याचे सांगीतले. पाटील साहेबं यांनी मला पोलीस निरीक्षक श्री भिलारे साहेब व पथकासह हॉटेल शिवतारा जवळ येत असल्याचे सांगुन सदर ठिकाणी मला हजर राहण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी माझे मोटार सायकलवरुन हॉटेल शिवतारा येथे हजर झालो. काही वेळात पोलीस उप अधीक्षक पाटील साहेब, भिलारे साहेब पथकासह सदर ठिकाणी हजर झाले. भिलारे साहेबांनी मला शासकीय बोलेरोमध्ये बसण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी शासकीय बोलेरोमध्ये बसलो. दि.10.12.2024 रोजी भिलारे साहेबांनी केले पडताळणीमध्ये पाटणकर पोलीस यांनी मला भारती हॉस्पीटल येथे आल्यानंतर कॉल करण्यास सांगीतले होते. सापळा कारवाईची वेळ व ठिकाण

पाटणकर पोलीस यांनी "आत्ता किती केला तुम्ही" असे मला विचारले, त्यावर मी पाटणकर पोलीस यांचा हात हातात घेवुन त्यांना "दोन मिनट ऐका आधी, हे बघा हातात हात द्या, यातुन बाहेर काढा, येवढं आमचं करा" असे म्हणुन पाटणकर पोलीस यांचा हात हातामध्ये घेवुन दाबला. त्यावेळी पाटणकर पोलीस यांनी "शंभर टक्के तुम्हाला बाहेर काढणार यातन, हा विषय झाल्या नंतर तुम्ही म्हंटलायच" असे म्हणाले. त्यावर मी पाटणकर पोलीस यांना "तुम्ही म्हंटलाय सोळा वर्षाचा हाय, मान्य आहे बाहेर काढणार खर यातनं पहिला बाहेर काढा" असे म्हणालो त्यावर पाटणकर पोलीस यांनी "काढतो ओ, तुम्ही काय काळजी करु नका" असे सांगीतले. त्यावर मी "तुम्ही पंचवीस म्हंटला, मी पंचवीस हजार रुपये खरच आणल्यात, खर यातनं पहिला मला बाहेर काढा, एवढंच माझं मत आहे, बस बाकीच काय नय" असे म्हणालो. त्यावर पाटणकर पोलीस यांनी मला "तुम्हाला द्यायचंत असेल तर द्या, नसेल तर देवु नका, मला काय अडचण नाही, आणि आम्ही घेतल म्हणजे अस नसतोय ते विषय मी पुढ होवुन सगळ कराय लागलोय, हा असा विषय हाय...काय करायच" असे म्हणाले. त्यावर मी पाटणकर पोलीस यांना "चला की, थांबताय इथ नाय थांबा इथंच" असे म्हणुन थांबणेस सांगीतले. त्यावर पाटणकर पोलीस यांनी मला त्यांची मोटार सायकल असलेचे सांगीतले. त्यावर मी पाटणकर पोलीस यांना "का इकडं जाऊया अलीकड, अलीकड चला इकड कुठतरी" असे म्हणालो त्यावर पाटणकर पोलीस "कोणतर बघतय आहे, तरी ड्रेसवर नाही सोडा" असे म्हणाले. आम्ही तेथेच बाजुस असले अँम्ब्युलन्सचे आडोशाला थांबलो. त्यावेळी मी पाटणकर पोलीस यांना "ड्रेसवर नाहीच हाय ओ तुम्ही, बर घ्या असे म्हणुन पंच नं 1 पटवर्धन यांना उद्देशुन ह्यासनी का समोर घेतलय फक्त यांच माणुस हाय समोर आपल्या, म्हणुन फक्त यासनी सांगीतल" असे म्हणालो. त्यावर पाटणकर पोलीस यांनी "नाय तर मी म्हटल होत संतोषला आण म्हटल होतच की" असे म्हणालो. त्यावर मी पंच नं 1 यांचेकडे बोट करुन "हेनी हायत, त्येनी त्यांची काम हाय की दोन तीन मोठी मोठी" असे म्हणाले. त्यावर पाटणकर पोलीस यांनी "त्यांचा काल फोन झालता"असे सांगीतले. त्यावर मी पाटणकर पोलीस यांना"मोठी मोठी काम हायत त्यामुळे, सर नाही ना"असे सांगीतले. त्यानंतर पाटणकर पोलीस काही न बोलता सदर ठिकाणावरुन मुख्य गेटकडे निघुन गेले, पाटणकर पोलीस यांनी माझे यांचेकडून 25,000/- रुपये लाच स्विकारली नसल्याने, आम्ही सदर ठिकाणी थांबुन राहीलो. त्यानंतर भिलारे साहेब व सापळा पथक आमचे जवळ आले. भिलारे साहेबांनी माझे गळ्यामध्ये अडकवलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन घेवुन बंद करुन ताब्यात घेतला. आम्ही सर्व मुख्य गेटचे बाहेर आलो.
झाले एकंदरीत कारवाईमध्ये पाटणकर पोलीस यांनी माझेशी लाच रक्कमे बाबत चर्चा करुन, संतोषला का आणले नाही असे म्हणुन माझेकडून लाच रक्कम न स्विकारता निघुन गेले आहेत. मला पाटणकर पोलीस हे लाचेची रक्कम स्विकारतील याची शक्यता वाटत असल्याने पुन्हा सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करुन सापळा कारवाई मागे घेवुन भिलारे साहेबांनी मला तसेच पंच व सापळा पथकास गोपनीयता पाळणे बाबत सुचना दिल्या.
दिनांक 12/12/2024 रोजी मी अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे हजर होवुन दि.11/12/2024 रोजी पाटणकर पोलीस हे कामात असल्यामुळे भारती हॉस्पीटल येथून पैसे न घेता निघुन गेलो होते. आज पुन्हा पाटणकर पोलीस यांची भेट घेण्याकरीता विश्रामबाग पोलीस ठाणे येथे जाणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर भिलारे साहेबांनी दोन्ही पंच यांना संपर्क करुन अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे हजर राहणे बाबत कळविले त्याप्रमाणे दोन्ही पंच हजर झाले. पाटणकर पोलीस हे माझेकडून लाचेची रक्कम स्विकारतील असे वाटत असल्याने पाटणकर पोलीस यांचे विरुद्ध पुन्हा सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले भिलारे साहेब यांनी पुन्हा सापळा कारवाईची तयारी करुन मला व पंच पटवर्धन यांना सुचना देवुन त्यानंतर पाटणकर पोलीस यांच्यावर सापळाकारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यास असले लेस द्वारे माझ्या गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मला व पंच पटवर्धन असे माझ्याकडील रॉयल इन्फील्ड मोटार सायकल नं एम.एच.51- 4159 वरुन पाटणकर पोलीस यांची भेट घेण्या करिता रवाना होवुन विश्रामबाग पोलीस ठाणे येथे गेलो. आमचे पाठोपाठ भिलारे साहेब पंच नं 2 व सापळा पथक हेही आले. पाटणकर पोलीस हे विश्रामबाग पोलीस ठाणे येथे नसल्याने माझी व त्यांची भेट झाली नाही. म्हणुन मी माझे मोबाईल नंबर 9175651317 वरुन पाटणकर पोलीस यांचे मोबाईल नंबर 9762873681 वर कॉल करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेतला कॉल पाटणकर पोलीस यांनी स्विकारला व त्यांनी मला "तुम्ही काय मला फोन करु नका, मी तुम्हाला फोन करतो" असे सांगुन कॉल कट केला. त्यानंतर मी व पंच पटवर्धन असे माझे मोटार सायकलने विश्रामबाग पोलीस ठाणे येथून रवाना होवून अँन्टी करप्शन ब्युरो सांगली येथे भिलारे साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी भिलारे साहेबांनी पंच पटवर्धन व मला सापळा कारवाई मधील हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन झालेल्या संभाषणाची खात्री केली. त्यानंतर पुन्हा सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करुन सापळा कारवाई मागे घेवुन भिलारे साहेबांनी मला तसेच पंच व सापळा पथकास गोपनीयता पाळणे बाबत सुचना दिल्या.
दिनांक 16/12/2024 रोजी मी अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे हजर होवुन दि.12/12/2024 रोजी

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

pravinkumar devappaa kamble(I (Inspector)) / 15101000402ssmgm8202y **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन ऑफिसर,
विश्रामबाग पोलीस स्टेशन, सांगली

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): pravinkumar devapp
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402ssmgm82

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सचिन कष्णा पसारे
**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982
**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 2993/899 कुलकर्णी मळा,कोल्हापूर रोड कबनुर, ताइचलकरं,जि कोल्हापूर,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 2993/899 कुलकर्णी मळा,कोल्हापूर रोड कबनुर, ताइचलकरं,जि कोल्हापूर,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**
**(j) Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9175651317

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शेखर पाटणकर | | | 1. विश्रामबाग पोलीस ठाणे, सांगली ,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

कबनुर, ता.इचलकरंजी, जि. कोल्हापूर मो. नं. 9175651317
मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास आहे. मी सेट्रींग सळी बांधणीचे काम करीत आहे. शिवनाकवाडी इचलकरंजी येथे सत्यराज पार्कमध्ये कारखान्याची इमारत बांधकाम सुरू असून मी सदर इमारतीचे स्लॅबची सळी बांधण्याचे काम घेतले आहे. माझ्याकडे एकुण 4 कामगार असून कामगार रामचंद्र माझी याचा लहान भाऊ धीरज माझी हा दि.07.12.2024 रोजी तो कामगार रामचंद्र माझी यास भेटण्यास आलेला होता. 11.30 वा चे सुमारास इमारतीचे बांधकामाचे ठिकाणी स्लॅबच्या प्लेटा व सळी बांधण्याचे काम सुरू असताना प्लेटा अचानक पडल्याने कामगार विकास चौधरी व धीरज माझी हे घसरून पडल्याने त्यांचे डोक्याला दुखापत झाली होती. त्या दोघांना भारती हॉस्पीटल, सांगली येथे अॅडमीट केले असुन त्यांच्यावर उपचार सुरू होते. दि.10.12.2024 रोजी विश्रामबाग पोलीस ठाणे येथील शेखर पाटणकर पोलीस यांनी माझ्याविरूध्द बालकामगार अंतर्गत गुन्हा दाखल न करण्यासाठी व धीरज माझी याचा जबाब माझ्या बाजुने घेण्यासाठी माझ्याकडे 50,000/- रूपयांची मागणी केली. मला शेखर पाटणकर यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी पोलीस उपअधीक्षक श्री.उमेश पाटील अन्टी करप्शन ब्युरो सांगली यांना संपर्क करुन माझी लाच मागणीची तक्रार कळवली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला अॅन्टी करप्शन कार्यालय सांगलीकडील पोलीस निरीक्षक श्री.विनायक भिलारे साहेब कारवाई करतील असे सांगुन दुपारी 16.00 वाचे सुमारास चाणक्य चौक, कुपवाड रोड, सांगली येथे येण्यास सांगीतले.
त्यानंतर 16.00 वाचे सुमारास पोलीस उप अधीक्षक श्री.पाटील साहेब यांनी मला संपर्क करुन त्यांचेकडील बोलेरो वाहनाचे वर्णन सांगुन चाणक्य चौक, कुपवाड रोड, सांगली येथे येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी माझेकडील रॉयल इन्फील्ड मोटार सायकल नं एम.एच.51- 4159 वरुन चाणक्य चौक, कुपवाड रोड, सांगली येथे दाखल झालो. मी मोटार सायकल पार्क करुन पाटील साहेब यांनी वर्णन सांगीतलेल्या बोलेरो वाहना जवळ जावुन माझी ओळख सांगीतली. पाटील साहेब यांनी मला बोलेरो मध्ये बसणेस सांगीतले त्याप्रमाणे मी बोलेरो वाहनामध्ये बसलो. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला भिलारे साहेबांची ओळख करुन दिली. भिलारे साहेबांनी मला सोबत असले दोन शासकीय पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. सदर कारवाई वेळी पंच नं.1 म्हणून श्री.सौरभ प्रकाश पटवर्धन यांनी व पंच नं.2 म्हणून श्री.साकिब राजू नाईकवाडी यांनी काम करण्याचे निश्चित केले.
त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.विनायक भिलारे साहेब यांनी मला दिले सुचनेप्रमाणे मी माझी श्री.शेखर पाटणकर, पोलीस, विश्रामबाग पोलीस ठाणे यांचेविरूध्द लाच मागणी बाबतची तक्रार समक्ष सांगितली असता भिलारे साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहिती देवून माझा लेखी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी त्यांना माझा लेखी तक्रारी अर्ज दिला. माझे तक्रारी अर्जावर पोलीस निरीक्षक भिलारे साहेब व दोन्ही पंचानी वाचून सह्या केल्या. त्यानंतर भिलारे साहेबांनी सांगली मिरज रोडला असले भारती हॉस्पीटल पासुन काही अंतरावर जिल्हा क्रिडा संकुलकडे कडे जाणारे रोड लगत असले हॉटेल शिवतारा जवळ हजर राहण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी माझेकडील मोटार सायकलने रवाना झालो. आमचे पाठोपाठ पाटील साहेब, भिलारे साहेब, पंच व सापळा पथक असे रवाना झाले. आम्ही सर्व हॉटेल शिवतारा नजीक दाखल झालो. भिलारे साहेबांनी मला शासकीय बोलेरो वाहनामध्ये बसण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी बोलेरो मध्ये बसलो. मी पाटणकर पोलीस यांचेविरुद्ध दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने भिलारे साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली.
त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 पटवर्धन असे माझेकडील रॉयल इन्फील्ड मोटार सायकल नं एम.एच.51- 4159 वरुन रवाना होऊन भारती हॉस्पीटल येथे दाखल झालो. त्यावेळी मी माझे मोबाईल नंबर 9175651317 वरुन पाटणकर पोलीस यांचे मोबाईल नंबर 9762873681 वर कॉल करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेतला, पाटणकर पोलीस यांनी माझा कॉल रिसीव्ह केल्यानंतर मी त्यांना भारती हॉस्पीटल येथे आलो असल्याचे सांगितले असता पाटणकर पोलीस यांनी हॉस्पीटलचे बाहेर मेनरोडला येवून थांबण्यास सांगितले. मी व पंच पटवर्धन असे पायी चालत भारती हॉस्पीटलचे मेनगेट समोरील सांगली मिरज रोडला आलो. पाटणकर पोलीस यांनी मला मित्र आलेत काय ? असे विचारले, मी त्यांना "न्हाय त्यांना फोन केला नाही, गडबडीत हाय अस आलोय" असे सांगीतले. त्यांनी मला "आलो पाच मिनीटात, रिक्षा स्टॉप हाय कणी बाहेर तिथं या की आलो" असे म्हणुन कॉल कट केला. मी व पंच पटवर्धन असे दोघे रिक्षा स्टॉप जवळ जावुन थांबलो. काही वेळाने पाटणकर पोलीस आम्ही थांबलो असले ठिकाणी आले. मी त्यांना नमस्कार केला. मी त्यांना पंच पटवर्धन यांची ओळख संतोषचा मेव्हणा अशी करुन दिली. त्यांचेत व माझेत माझे मित्राचे आईचे औषधोपचारा बाबत चर्चा झाली. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे भारती हॉस्पीटल येथे अॅडमीट असले पोरांचे तब्येती बाबत विचारपुस केली. त्यावेळी मी त्यांना "विकास तयार झालाय, डोळा पण उघडलाय

निश्चित करण्यासाठी मी माझे मोबाईल नंबर 9175651317 वरुन पाटणकर पोलीस यांचे मोबाईल नंबर 9762873681 वर कॉल करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेतला. भिलारे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे समोर धरला पाटणकर पोलीस यांनी घरी आलो आहे. चार वाजता येतो, संतोषला बोलवुन घ्या असे सांगुन कॉल कट केला त्यानंतर भिलारे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला.
पाटणकर पोलीस यांनी माझा कॉल रिसीव्ह करुन चार वाजता येतो असे सांगीतल्याने चार वाजता सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही व सापळा पथक असे आमचेकडील वाहनांने हॉटेल शिवतारा येथून रवाना होवुन उष:काल हॉस्पीटल धामणी येथे सुरक्षीत ठिकाणी दाखल झालो.
त्यानंतर 15.30 वाजण्याचे सुमारास आम्ही सर्व उष:काल हॉस्पीटल धामणी येथून रवाना होवुन हॉटेल शिवतारा येथे दाखल झालो. भिलारे साहेबांनी मला शासकीय बोलेरोमध्ये बसण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी शासकीय बोलेरोमध्ये बसलो. मी पाटणकर पोलीस यांना कॉल केला होता. त्यावेळी पाटणकर पोलीस यांनी चार वाजता येतो असे सांगीतले होते. त्यामुळे सापळा कारवाईची वेळ व ठिकाण निश्चित करण्यासाठी मी माझे मोबाईल नंबर 9175651317 वरुन पाटणकर पोलीस यांचे मोबाईल नंबर 9762873681 वर कॉल करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेतला. भिलारे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे समोर धरला पाटणकर पोलीस यांनी माझा कॉल रिसीव्ह करुन संतोष आला आहे काय? असे विचारले, मी त्यांना संतोष नाही, असे सांगीतले. त्यावर ते संतोषला बोलवुन घेण्यास सांगीतले होते असे सांगुन विश्रामबाग पोलीस ठाणे येथे येण्यास सांगीतले. त्यानंतर मी त्यांना "नाय तिथं येवु नका, या आपल आऊटला बर पडतय" असे म्हणुन भारती हॉस्पीटल येथे येण्यास सांगीतले. त्यावर त्यांनी "माझी गाडी घेवुन येतो तिथं या" असे सांगीतले. त्यावर मी "कोण नई या तुम्ही" असे सांगीतले. त्यावर ते "आलो रोडवर आलो इथ थांबा" असे मला म्हणाले. त्यावर मी त्यांना "नाई आत या म्हटलं रोडला नको कालच्या सारख, पेमेंट द्यायचय" असे सांगीतले. त्यावर ते "रोडवर या की इथं" असे मला म्हणाले. त्यावर मी त्यांना "आपण चहा घेतोय इथं या की सर, चहा पण घेवुया तिथं" असे म्हणालो. त्यावर त्यांनी "बाहेर रस्त्यावर हाय की इथ चहावाला" असे सांगीतले. त्यावर मी त्यांना "ठिक हाय या की सर" असे सांगीतले नंतर कॉल कट झाला. आमचेमधील संभाषण संपल्यानंतर भिलारे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला. झाले एकंदर कारवाईमध्ये पाटणकर पोलीस यांनी माझे विरुद्ध बालकामगार कामास ठेवले बाबत कारवाई न करण्यासाठी व धीरज माझी याचा जबाब माझ्या बाजुने घेण्यासाठी माझ्याकडे मागणी केलेले 25,000/- रूपये घेवुन भारती हॉस्पीटल येथे बोलावले सदर ठिकाणी कारवाई आयोजित करण्याचे ठरले.
भिलारे साहेब यांनी मला लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता मी माझेकडील शिल्लकीतील 500/- रूपये दराच्या 50 नोटा असे एकुण 25,000/- रुपये हजर केले. त्यानंतर पाटणकर पोलीस यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने भिलारे साहेबांनी मला व दोन्ही पंच यांना अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन सर्व सापळापुर्व कार्यवाही, मी हजर केलेली लाच रक्कम पंचवीस हजार रुपये नोटांना अँथ्रासीन पावडर लावुन सदरच्या नोटा माझे पॅन्टचे उजवे बाजुचे खिश्यात ठेवल्या, त्यानंतर मला दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने भिलारे साहेबांनी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पाटणकर पोलीस यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यास असले लेस द्वारे माझ्या गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मला व पंच पटवर्धन असे माझ्याकडील रॉयल इन्फील्ड मोटार सायकल नं एम.एच.51- 4159 वरुन रवाना झालो. आमचे पाठोपाठ आपण, पाटील साहेब, पंच नं 2 नाईकवाडी व सापळा पथक असे शासकीय बोलेरो व मधुन लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, काळे रंगाचे कापड, व इतर आवश्यक साहित्य घेऊन तसेच पोनि श्री. किशोरकुमार खाडे व पोलीस अंमलदार पोशि जाधव बजाज पल्सर मोटार सायकल वरुन रवाना झालो. पोशि पाटील हे सुटकेस सहीत जागेवरच थांबून राहीले.
मी व पंच नं 1 पटवर्धन असे माझे रॉयल इन्फील्ड मो.सा. क्र. एमएच 51 – 4159 वरुन रवाना होऊन भारती हॉस्पीटलचे गेट समोर दाखल झालो. सदर ठिकाणी असले पार्कींगमध्ये मोटार सायकल पार्क करुन आम्ही सदर ठिकाणी थांबुन राहीलो. काही वेळाने माझे मोबाईलवर पाटणकर पोलीस यांचा फोन आला सदर कॉल रिसीव्ह करुन "आत या, चहाचे टपरीवर मेनगेट जवळ आतल्या बाजुला" असे सांगुन कॉल कट केला. आम्ही रोड लगत असले मेनगेट वरुन पायी चालत आकस्मीक दुर्घटना विभागाकडे रवाना झालो. सदर ठिकाणी आकस्मीक दुर्घटना विभागाचे बाहेरील मुख्य दरवाजापासुन काही अंतरावर असले चहाचे टपरी जवळ थांबुन राहीलो. तेवढ्यात पाटणकर पोलीस आमचे जवळ आले. मी व पाटणकर पोलीस यांचे सोबत चहा घेणे बाबत चर्चा केली. त्यानंतर पाटणकर पोलीस यांनी पेशंटचे तब्येती बाबत व त्यांचे खाण्यापिण्या बाबत चर्चा केली. दरम्यान मी चहावाल्याला चहाचे पैसे विचारुन चहावाल्यास चहाचे वीस रुपये दिले त्यानंतर मी पाटणकर पोलीस यांना "इकडं जाऊया का? नाई क्लिअर बोललेल बर ओ सर बाकीच काय नई" असे म्हणुन आम्ही पायी चालत चहाचे टपरी जवळून बाहेर येवु लागलो. त्यावेळी

केलेल्या कारवाईमध्ये पाटणकर पोलीस मला फोन करतो असे म्हणाले होते. परंतु त्यांचा फोन आला नाही. आज पुन्हा पाटणकर पोलीस यांची भेट घेण्याकरीता विश्रामबाग पोलीस ठाणे येथे जाणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर भिलारे साहेबांनी दोन्ही पंच यांना संपर्क करुन अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे हजर राहणे बाबत कळविले त्याप्रमाणे दोन्ही पंच हजर झाले. पाटणकर पोलीस हे माझेकडून लाचेची रक्कम स्विकारतील असे वाटत असल्याने पाटणकर पोलीस यांचे विरुद्ध पुन्हा सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले भिलारे साहेब यांनी पुन्हा सापळा कारवाईची तयारी करुन मला व पंच पटवर्धन यांना सुचना देवुन त्यानंतर पाटणकर पोलीस यांच्यावर सापळाकारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यास असले लेस द्वारे माझ्या गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मला व पंच पटवर्धन असे माझ्याकडील रॉयल इन्फील्ड मोटार सायकल नं एम.एच.51- 4159 वरुन पाटणकर पोलीस यांची भेट घेण्या करिता रवाना होवुन विश्रामबाग पोलीस ठाणे येथे गेलो. आमचे पाठोपाठ भिलारे साहेब पंच नं 2 व सापळा पथक हेही आले. पाटणकर पोलीस हे विश्रामबाग पोलीस ठाणे येथे नसल्याने माझी व त्यांची भेट झाली नाही. म्हणुन मी माझे मोबाईल नंबर 9175651317 वरुन पाटणकर पोलीस यांचे मोबाईल नंबर 9762873681 वर कॉल करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेतला कॉल पाटणकर पोलीस यांनी स्विकारला व त्यांनी मला "तुम्ही काय मला परत फोन करु नका" असे सांगुन कॉल कट केला. त्यानंतर मी व पंच पटवर्धन असे माझे मोटार सायकलने विश्रामबाग पोलीस ठाणे येथून रवाना होवून अँन्टी करप्शन ब्युरो सांगली येथे भिलारे साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी भिलारे साहेबांनी पंच पटवर्धन व मला सापळा कारवाई मधील हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन झालेल्या संभाषणाची खात्री केली. त्यानंतर सापळा कारवाई मागे घेवुन भिलारे साहेबांनी मला तसेच पंच व सापळा पथकास गोपनीयाता पाळणे बाबत सुचना दिल्या.

पोलीस शेखर पाटणकर यांनी दिनांक 07/12/2024 रोजी माझे सेंट्रींगचे कामावर धीरज माझी हे घसरून पडल्याने त्यांचे डोक्याला दुखापत झाले बाबत घडलेल्या घटनेतील जखमी झालेले धीरज माझी हे बालकामगार ठेवला असून तुमच्यावर बालकामगार अंतर्गत गुन्हा दाखल करायला लागणार असल्याचे सांगुन माझ्याविरुध्द बालकामगार अंतर्गत गुन्हा दाखल न करण्यासाठी व धीरज माझी याचा जबाब व्यवस्थीत घेण्यासाठी माझ्याकडे 50,000/- रूपयांची लाच मागणी केलेने दिले तक्रारी अर्जा प्रमाणे पाटणकर पोलीस यांचेकडे दिनांक 10/12/2024 रोजी केले पडताळणी कारवाई मध्ये त्यांनी 25,000/- रुपये लाचेची मागणी करुन सोबत संतोष यांस सोबत घेवुन लाच रक्कम घेवुन येण्यास सांगितले असता दिनांक 11/12/2024 रोजी सापळा कारवाई दरम्यान पाटणकर पोलीस यांना लाच रक्कम देण्यासाठी गेलो असता पाटणकर पोलीस यांनी संतोष यास सोबत आणले नाही म्हणुन लाच रक्कम न स्विकारता निघुन गेले होते. पाटणकर पोलीस यांनी लाच रक्कम न स्विकारल्याने पुन्हा दिनांक 12/12/2024 व दिनांक 16/12/2024 रोजी सापळा कारवाई दरम्यान लाच रक्कम देण्यासाठी गेलो असता त्यांची भेट झाली नाही परंतु त्यांनी प्रथम फोन उचलुन पुन्हा फोन करतो असे सांगितले होते परंतु दुस-या वेळेस फोन केला असता त्यांनी पुन्हा फोन करु नका असे म्हणुन फोन कट केला यावरुन पाटणकर पोलीस हे आता लाच रक्कम स्विकारतील असे वाटत नाही. तरी पोलीस शेखर पाटणकर यांनी 25,000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेवर कारवाई व्हावी. म्हणुन जबाब दिलेने भिलारे साहेबांनी सापळा कारवाईची इतर कारवाई ही अँन्टी करप्शन कार्यालयात पुर्ण केली. तसेच सापळा कारवाईवेळी मी हजर केलेली लाच रक्कम बदलुन मला परत दिली. तरी दिनांक 10/12/2024 रोजी 18.49 ते 19.19 वा.चे दरम्यान भारती हॉस्पीटल सांगलीचे मेनगेट समोरील सांगली मिरज रोड लगत असले रिक्षा स्टॉप जवळ पोलीस शेखर पाटणकर नेमणुक विश्रामबाग पोलीस ठाणे यांनी स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने माझे विरुद्ध बालकामगार कामास ठेवले बाबत कारवाई न करण्यासाठी व धीरज माझी याचा जबाब माझ्या बाजुने घेण्यासाठी माझ्याकडे 25,000/- रूपये लाचेची मागणी केलेली आहे. म्हणुन पोलीस शेखर पाटणकर नेमणुक विश्रामबाग पोलीस ठाणे यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,